# नियमीत दिवाणी दावा नं.३१७/२०२४ मधील नि. १५ खालील आदेश

(लवकेश भुसनर वि.नाना भुसनर व इतर)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, प्रतिवादी क्र.१ हे ऊसतोडीसाठी परगावी गेलेले होते. त्यामुळे वेळेत न्यायालयात येऊन कैफियत व म्हणणे दिले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफियत म्हणणेचा आदेश केलेला आहे. वास्तविक पाहता सदरची कैफियत प्रतिवादीने वेळेत देणे आवश्यक होते. प्रतिवादीने जाणुन बुजून सदरचा उशीर केलेला नाही. सबब, वरील कारणास्तव कैफियत देणेसाठी झालेला विलंब माफ करणेची विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, प्रतिवादी क्र.१ यांनी दिलेला अर्ज चुकीचा आहे. प्रतिवादी यांनी जाणून बुजून उशिरा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी यांनी मुद्दाम जाणीवपूर्वक विलंब केल्याने जास्तीत जास्त कॉस्टचा आदेश व्हावा.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दि.२२.१०.२०२४ रोजी समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ हे दि. १३.१२.२०२४ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. वास्तविक प्रतिवादी यांनी त्यांना समन्स बजावणीपासून साधारण ३० दिवसांच्या आत व त्यापुढे ६० दिवसांमध्ये म्हणजे एकूण ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे गरजेचे होते. कायद्याप्रमाणे कैफियत दाखल करणेची मुदत ९० दिवसांनी संपते. सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणांगुणावर

होण्यासाठी आवश्यक आहे.

५. प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास साधारण २ महिने १५ दिवसाचा विलंब झाल्याचे दिसून येते. सदर विलंबाबाबत त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. प्रतिवादींनी दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. तरी सदरचा दावा स्थावर मिळकतीचा असल्यामुळे प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.१६ खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत खर्चाचे आदेश पारित करुन सदरचा विलंब माफ करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब वादीस खर्चाची रक्कम रु.२००/– देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

KANCHAN BABASAHEB SONAWANE Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE Date: 2025.04.19 11:29:40 +0530

( **के. बी. सोनवणे** )

दि. ०७/०४/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला, जि. सोलापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | Smt. S.S.Kolekar |
| **(b)** | Court | **:-** | Smt. K.B.Sonawane<br>Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 07.04.2025 |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 07.04.2025 |